
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# सरकारी कर्मचाऱ्यांच्या पीएच.डी. संशोधनाची किंमत फक्त तीस हजार रूपये

डॉ. तुषार निकाळजे

**प्रस्तावना :**



नुकतीच केंद्रशासनाने एक घोषणा केली. केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या शिक्षण भत्यात भरीव वाढ केली. पीएच.डी. पदवीसारखे शिक्षण घेणाऱ्यास २० वर्षांपूर्वी रूपये दहा हजार एक रकमी भत्ता मिळत होता. आता त्यामध्ये वाढ करून रूपये तीस हजार मिळत आहेत. ही सरकारी कर्मचाऱ्यांनी केलेल्या पीएच.डी. संशोधनाची कि कर्मचाऱ्यांची कुचेष्टा म्हणावी? असा प्रश्न उपस्थित होतो. पीएच.डी. संशोधनाचा कष्टप्राय प्रवास, कष्ट, यातील नियमांचा, सवलतींचा भेदभाव, तफावत याचा शोध घेण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे.

कर्मचारी हा मनुष्यबळ विकासातील एक घटक आहे. हे प्रथमतः आवर्जुन सांगण्याची गरज आहे. हा कर्मचारी वेगवेगळ्या प्रकारे दुर्लक्षित केला गेला की, दुर्लक्षिला गेला याचे एक उदाहरण म्हणजे कर्मचाऱ्याची शैक्षणिक प्रगती. शिक्षण, उच्चशिक्षण, संशोधन याने प्रगती होते असे तज्ञ विचारवंतांचे मत आहे. हे कर्मचारी स्वतःचे दिलेले काम संभाळून निवडणूक, मतदान, जनगणना (जातीनिहाय, डोईनिहाय, आर्थिक) याचे काम करताना, लोकशाही अबाधित ठेवण्याचे काम देखील करतात याचा विसर पडलेला दिसतो.

**प्रवेशाची शैक्षणिक अट :-** पदव्युत्तर शिक्षण (एम.ए. एम.एस.सी., एम.कॉम. इत्यादी) किमान ५०% गुण मिळवून उत्तीर्ण, सेट, नेट, एम.फील., उत्तीर्ण असल्यास प्रवेश परीक्षेमधून सूट, जातीनिहाय संवर्गातील विद्यार्थ्यांना शासकिय बिंदूनामावली तरतुदीनुसार प्रवेश.

**संशोधनाचा कालावधी :-** किमान दोन वर्षानंतर पीएच.डी. प्रबंध सादर करता येतात. जास्तीत जास्त पाच वर्षे कालावधी नंतर दरवर्षी पुढील तीन वर्षापर्यंत वाढीव मुदत मिळू शकते.

**विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्कॉलरशिप्स, फेलोशिप्स :-** विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली, आय.सी.एस.एस.आर., आय.सी.सी.आर. यांच्यामार्फत दोन, तीन वर्षांकरिता दरमहा किमान रू.२५ हजार स्कॉलरशिप, फेलोशिप्स मिळतात. नोकरी करणाऱ्यांना या सवलती मिळणार नाही असा नियम आहे. तसेच वयाची अट देखील आहे.

**वेतनी अध्ययन रजा :-** प्राध्यापकांना उच्च शिक्षण एम.फील., पीएच.डी. सारख्या शिक्षणासाठी वेतनी अध्ययन रजा दोन वर्षापर्यंत मिळते. याकरिता विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी एफ.आय.पी. (विद्याशाखा प्रगती योजना) व राज्य

शासनाने व संबंधित विद्यापीठाने परिनियम (स्ट्रॅच्युट) मध्ये तरतूद केली आहे. परंतु महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८४ नियम ८० नुसार कर्मचाऱ्यांना दोन वर्षापर्यंत वेतनी अध्ययन रजा तरतूद असताना देखील मंजूर केली जात नाही. रजा नामंजूर करण्याची नऊ वेगवेगळी कारणे सांगितली जातात. आर्थिक तरतूद नाही, आर्थिक तरतूद दाखवून दिल्यास, शिक्षकेतर सेवकांसाठी रजा नियम नाही. शिक्षकेतर सेवकांसाठी रजा नियम नाही. आपल्या संशोधनाचा विषय कार्यालयास उपयुक्त नाही आणि इतरही नकारात्मक कारणे सांगितली जातात. मा. नियुक्ती अधिकारी स्वतः अशा रजा नामंजूर करतात. त्याचे कारण सेवकाचा अभ्यासक्रम विद्याविषयक आहे. त्यामुळे वेतनी रजा नामंजूर असा शेरा लिहितात.

**सबायटीकल रजा :–** प्राध्यापकांना संशोधन अथवा संशोधनात्मक पुस्तके लिहिण्यासाठी एक वर्षापर्यंत वेतनी रजा असते. परंतु अशाप्रकारच्या किंवा त्यास समकक्ष रजा सेवकांना नसतात. अशा प्रकारच्या रजेची तरतूद नियमात अध्यापकेतर सेवकांकरिता नसल्याने एक निवेदन दिले जाते. शासनाकडे असा प्रस्ताव पाठविण्यात यावा व संबंधित कार्यालयाच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये देखील याचा विचार व्हावा. परंतु शासनाकडे शिफारस करणे तर दूरच राहो. व्यवस्थापन परिषदेपुढेदेखील हा प्रस्ताव चर्चेसाठी ठेवला जात नाही. या निवेदनात सेवक पीएच.डी. धारक असताना देखील हा प्रकार.

**एम.फील व पीएच.डी. धारक सहाय्यक प्राध्यापकांना विशेष आर्थिक लाभः** सहाय्यक प्राध्यापक पदावर नियुक्ती होताना जर एखादा उमेदवार एम.फील. उत्तीर्ण असेल तर त्याला दोन वार्षिक वेतनावाढी व पीएच.डी. उत्तीर्ण असल्यास पाच वेतनवाढी आगाऊ मिळतात. सेवेत नियुक्ती झाल्यानंतर असे प्राध्यापक जर नंतर एम.फील. किंवा पीएच.डी. उत्तीर्ण झाले तर त्यांना अनुक्रमे दोन व तीन वार्षिक वेतनवाढी मिळतात. हा फायदा त्यांना दिनांक ०१/०९/२००८ च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आदेशानुसार मिळत आहे.

**राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदांकरिता सवलती :–** प्राध्यापकांना राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील परिषदा सभांला उपस्थित राहण्याकरिता शासकिय सुट्ट्या मिळतात. तसेच या परिषदांकरिता जाण्यायेण्याचे प्रथम दर्जाचे रेल्वे भाडे किंवा विमानाचे तिकिट, नोंदणी फी, टॅक्सीभाडे, राहण्याचा–जेवणाचा खर्च दिला जातो. परंतु जे कर्मचारी सेवक पात्र (एम.फील., पीएच.डी.) आहेत त्यांना अशा कोणत्याही सवलती कुठल्याही नियमांत नाहीत.

**संशोधन प्रकल्प :–** प्राध्यापकांकरिता संशोधन प्रकल्प करण्यासाठी रू.२ लाख व ५ लाख एवढी तरतूद असते. या प्रकल्पांना मायनॉर (लघु) व मेजर (दीर्घकालीन) प्रकल्प म्हणून संबोधतात. अशी संशोधन प्रकल्प मिळण्यासाठी सेवकांना नियमात तरतूद नाही. जरी ते सेवक एम.फील., पीएच.डी उत्तीर्ण असेल तरी देखील राज्य शासनाकडे असे प्रस्ताव पाठविल्यास त्यावर मंजूर/नामंजूर अशी कोणतीही उत्तरे वर्षानुवर्षे मिळत नाहीत.

**समित्यांमध्ये सदस्यत्व :–** व्यवस्थेत वेगवेगळ्या स्तरांवर वेगवेगळ्या समित्या काम करीत असतात. त्यामध्ये फक्त प्राध्यापक व एखादा प्रशासकिय अधिकारी असतो. परंतु कर्मचाऱ्यांची शैक्षणिक पात्रता असूनही त्यास या समित्यांमध्ये १९७४ ते २०१८ पर्यंतच्या कोणत्याही नियमात स्थान नाही. या समित्यांच्या सदस्यांना विशेष आर्थिक लाभही नियमानुसार मिळत असतो.

**धारणाधिकार :–** प्राध्यापकांना अध्ययन रजा मंजूर करताना धारणाधिकार मंजूर करतात परंतु एखाद्या सेवकाला उच्च शिक्षणासाठी स्कॉलरशिप किंवा फेलोशिप मंजूर होत असल्यास त्याला विद्यापीठ किंवा महाविद्यालयामार्फत धारणाधिकार देखील मंजूर केला जात नाही. त्यामुळे त्याचे शैक्षणिक नुकसान होते.

**पुस्तक प्रकाशनाचा खर्च :–** प्राध्यापकाने एखादे पुस्तक प्रकाशित केले तर त्यास रू.२५ ते ३५ हजार पुस्तक प्रकाशनाचा खर्च मिळतो. परंतु शिक्षकेतर सेवकास एक रूपयाही खर्च मिळत नाही.

**ए.पी.आय. (ॲव्हरेज परफॉर्मन्स इंडीकेटर) (शैक्षणिक कार्यक्षमता निर्देशांक) :–** प्राध्यापक ते प्राचार्य या पदावर नियुक्ती होण्यासाठी ए.पी.आय. मूल्यांकन केले जाते. त्यामध्ये प्राध्यापकांनी त्यांच्या कार्यकालामध्ये किती राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय सेमिनार्स ॲटेंड केले. किती पुस्तके लिहिली आहेत. किती जर्नल्स् लिहिली आहेत इत्यादींचा हिशोब केला जातो. परंतु कर्मचाऱ्यांना अशी कोणतीही कामे केली असल्यास त्याची कोठेही गणना होत नाही.

**कर्मचाऱ्यांच्या पीएच.डी. संशोधनाबाबतचे तज्ञांचे मत पुढीलप्रमाणे :–**

**अहवाल–पीएच.डी. पदवी प्राप्त केलेल्या कर्मचाऱ्यांना अर्थसहाय्य :–** ह्या संदर्भात नियुक्ती केलेल्या एक सदस्य समितीचा अहवाल उपरोल्लेखित पत्राला अनुसरून पीएच.डी. पदवी प्राप्त केलेल्या कर्मचाऱ्यांना अर्थसहाय्य करण्याबाबत सखोल चर्चा करून धोरणात्मक निर्णय व्हावा या दृष्टिने नियुक्त केलेल्या समितीचा सदस्य म्हणून खालील प्रमाणे अहवाल देत आहे.

**कार्यपद्धती व विचारात घेतलेले घटक :–**

१) संबंधित अधिकाऱ्यांशी त्यांचे मत अजमावण्यासाठी चर्चा केली.

२) पीएच.डी. पदवी प्राप्त केलेल्या काही कर्मचाऱ्यांशी चर्चा.

३) शासकीय विभागात पीएच.डी. किंवा उच्च गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या कर्मचाऱ्यास प्रोत्साहित भत्ते, वेतन, आर्थिक लाभ ह्या संबंधीच्या तरतुदी आहेत किंवा कसे ह्याबद्दल माहिती घेण्याचा प्रयत्न केला.

४) पीएच.डी. पदवीप्राप्त शिक्षकांना देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याबद्दलची माहिती विचारात घेतली.

५) इतर कार्यालयात काय योजना आहे त्यांची माहिती घेण्याचा प्रयत्न केला.

६) अर्थसहाय्य देण्याची गरज/महत्व, त्यामुळे होणारे संभाव्य लाभ, परिणाम ह्या गोष्टींचा विचार केला. वरील घटक लक्षात घेतल्यावर समितीच्या शिफारशी खालील प्रमाणे आहेत.

संशोधन कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी अतिशय प्रेरणादायी योजना राबविण्यास सुरूवात केली आहे. पीएच.डी. प्राप्त शिक्षकांना २ वा ४ वेतनवाढी देण्यात येतात. त्याचाही लाभ अनेक शिक्षकांना मिळत आहे. वरील परिस्थिती लक्षात घेता जे कर्मचारी स्वतःचे दैनंदिन कामकाज सांभाळून, संशोधन करून, पीएच.डी. पदवी प्राप्त करतात त्यांचीही योग्य ती दखल घेऊन त्यांना प्रोत्साहीत करण्याच्या दृष्टिने अर्थसहाय्य करणे आवश्यक आहे. स्वतःच्या प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळून अशा रितीने पीएच.डी. प्राप्त करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे प्रमाणही अत्यल्प असल्याचे लक्षात येते. त्यांना आर्थिक व इतर प्रकारचे प्रोत्साहन दिल्यास त्यांच्यामधील गुणवत्तेचे योग्य ते कौतुक होईल व गुणवत्ता जोपासण्यास, तिची वृद्धी होण्यास निश्चितच मदत होईल. प्रशासन कार्याची गुणवत्ता सुधारण्यासही मदत होईल.

**पीएच.डी. प्राप्त कर्मचाऱ्यांमुळे खालील प्रकारचे लाभ होऊ शकतात**

- **गुणवत्तेची जोपासना होते.**
- **कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक गुणवत्तेत वाढ :** त्यांची विश्लेषणात्मक विचार करण्याची क्षमता वाढते. त्याचा उपयोग त्यांच्या दैनंदिन प्रशासकिय कार्यातही होऊ शकतो.
- कार्यपद्धतीमध्ये शास्त्रीय दृष्टिकोन निर्माण होतो.
- कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक गुणवत्तेत व क्षमतेमध्ये वृद्धि झाल्याने त्यांचे प्रशासन कार्यातील योगदानही अधिक चांगल्याप्रकारे होऊ शकते.



LBP PUBLICATION

**संशोधन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना खालील प्रकारे प्रोत्साहन देता येईल :**

पीएच.डी. पदवी प्राप्त करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दोन वेतनवाढी देण्याची शासनाकडे शिफारस करावी. दोन वेतनवाढी मिळण्यासाठी शासनाची मंजुरी आवश्यक नसल्यास वेतनवाढी मंजूर करण्यास हरकत नसावी.

पीएच.डी. प्राप्त कर्मचाऱ्यांना रू.१०,०००/- एवढे अनुदान संशोधन खर्चापोटी मंजूर करावे. अनुदान मंजूर करताना वित्त व लेखा विभागाकडून आवश्यक ते नियम कार्यपद्धती ठरवून घेण्यात यावी. तसेच अनुदान मंजूर करण्यापूर्वी संशोधन कार्य पीएच.डी. पदवी करणाऱ्या उमेदवारांकडून पीएच.डी. पदवी केंव्हा प्राप्त केली, कोणत्या विद्यापीठाची पदवी आहे, पीएच.डी. प्रबंधाचा विषय, झालेला खर्च किती, मार्गदर्शक, त्यांचा अभिप्राय ह्या सर्व गोष्टींची माहिती घेण्यात यावी.

पीएच.डी. पदवी प्राप्त कर्मचाऱ्यांचा पदोन्नतीसाठी विचार करताना त्यांच्या पीएच.डी. पदवीचा विचार व्हावा. काही प्रमाणात वेटज देण्याचाही विचार व्हावा.

ज्या कर्मचाऱ्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. अशा कर्मचाऱ्यांना अर्थसहाय्य देताना (खर्च व इतर बाबतीत) लवचिकता ठेवून व गाईड (मार्गदर्शकांचे) प्रमाणपत्र/अंडरटेकींग घेऊन मंजुरी देण्यात यावी. कामावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी पीएच.डी. संशोधनाचे काम हाती घेतल्यास त्यांना काही प्रमाणात विशेष रजेची देखील तरतूद करावी सदर रजा कर्मचारी व कार्यालय ह्यांचे गरजेनुसार व सोयीनुसार दिल्यास संशोधन कार्यास प्रोत्साहन मिळून दोघांनाही त्याचा लाभ होऊ शकेल.

वरीलप्रमाणे पीएच.डी. पदवी प्राप्त करणाऱ्या व संधोधन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देताना त्या संबंधीचे सविस्तर नियम, किमान अटी व पात्रता इ. बाबत तयार करणेही गरजेचे आहे.

**अध्ययन रजा कर्मचाऱ्यांना नाकारण्याची नियुक्ती अधिकाऱ्यांची कारणे:-**

कर्मचाऱ्यांना रजा सवलतीचे नियम नाहीत, आर्थिक तरतूद नाही, पीएच.डी. शिक्षणाचा कार्यालयास उपयोग नाही. (रू.२ लाख ४० हजारांची वेतनी अध्ययन रजा नामंजूर होण्यासाठी न्यायालयात वकिलांची रू.७ लाख ८० हजार फी देणारे काही महाभाग नियुक्ती अधिकारी वेगळेच).

**शिक्षकांचा सुखकर, अधिकाऱ्यांचा शॉर्टकट, संशोधनाचा प्रवास -**

सेवेत किंवा नोकरीमध्ये रूजू झालेल्या प्राध्यापकांना पीएच.डी. संशोधनाकरीता दोन वर्षे पूर्ण वेतनी रजा मिळते. UGC मार्फत मिळते Teachers Fellowship मिळते, त्यासोबत इतर भत्तेही मिळतात. अशा प्राध्यापकांना संशोधनाची माहिती गोळा करण्यासाठी त्यांचे विद्यार्थीदेखील मदत करतात. या विद्यार्थ्यांना Hiring charges दिले जातात. प्राध्यापकांचा पेशा/व्यवसाय हा शैक्षणिक स्वरूपाचा असल्याने त्यांना या संशोधनात येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाययोजनांची तशी थोडीफार कल्पना असते. त्यामुळे त्यांच्या संशोधनावर त्याचा फारसा दुष्परिणाम होत नाही. या प्राध्यापकांची पीएच.डी. बऱ्याचवेळा जास्तीत जास्त तीन वर्षामध्ये पूर्ण होते. त्यांना पाच वर्षे वाट पहावी लागत नाही. त्यांचा हा मार्ग पूर्णपणे सुखकर आहे असे म्हणणे चुकीचे वाटते. पण खूप अडचणी निश्चित नाही.

शिक्षक, प्राध्यापक यांना अशा वेगवेगळ्या लाभदायक योजना सुखकरपणे मिळतात. व्यवस्थेतील प्रशासकिय अधिकारी संशोधन वेगळ्या प्रकारे करताना दिसतात. शासनाच्या नियमांचे शॉर्टकट व्यवस्थितरित्या पार करून यांच्या पीएच.डी. प्रवासाची नौका सुखकरपणे पार होते. विद्यापीठ अनुदान आयोगाने वर्ष २००९ मध्ये संशोधनाची किमान श्रेणी (दर्जा) टिकविण्यासाठी नियम केला आहे. संशोधन कर्त्याने संशोधन केंद्रावर किमान १८० दिवस हजर राहणे बंधनकारक केले आहे. परंतु प्रशासकिय अधिकारी फक्त ३८ ते ७९ दिवस हजर असतात. मग माच वर्षे नोकरी सांभाळून, संशोधन कसे केले असेल? याचा प्रश्न उपस्थित राहतो. अशा बोगस पदवी मिळविणाऱ्या अधिकाऱ्यांची तक्रार नियुक्ती अधिकारी, संशोधन केंद्रे, विद्यापीठे यांचेकडे केल्यास या तक्रार अर्जांना केराची टोपली दाखविली जाते.

**सरकारी नोकरी अर्धी भाकरी**

सरकारी नोकरी अर्धी भाकरी ही एक परंपरागत म्हण आहे. ज्यांना सरकारी नोकरी मिळते, त्यांना आयुष्यभर अर्धी भाकरी मिळतेच असा समज आहे. परंतु ही अर्धी भाकरी मिळवितानाच किती कष्ट घ्यावे लागते हे सरकारी नोकरी मिळविल्यानंतर ती टिकवितानाच समजते. किंबहुना ही अर्धीच भाकरी खाऊन आयुष्यभर समाधान मानावे लागते. प्रारंभीच्या दोन पाच वर्षात वाटणारा आनंद किंवा उत्साहाचे रूपांतर एका विशिष्ट चाकोरीबद्ध आयुष्यात केव्हा होते हे कळत देखील नाही. या सर्व गोष्टी कळत असतानाच नंतर असे लक्षात येते की, आपणही या व्यवस्थेचे शोषित घटक आहोत. आणि अशावेळी हतबल होतो. इतरांच्या बाबतीत असेच घडत असल्याने आपल्याशी घडत असलेल्या घटना आपण नाईलाजाने किंवा आनंदाने स्विकारतो आणि त्यावरच जगत असतो. काहीजण त्यांच्या वेदना पत्रव्यवहार किंवा तक्रारीद्वारे मांडतो. पण त्याच पुढे काय होत? तो प्रश्न त्याच्यापुरताच मर्यादित उपाययोजना म्हणून निकाली निघतो परंतु इतरांचे काय? बरेचसे शासन निर्णय, नियम पाहिले तर ते १९६३ पासून आजपर्यंत आहे तसेच परंतु...? उलट परिस्थिती कितीही, कशाही प्रकारे बदलली तरी नियम त्यांच्याशी घट्ट आहेत. कधीकधी शासन निर्णयांची अंमलबजावणी व्यक्तीनिहाय बदलते. काही सेवक आपल्या संवेदना वृत्तपत्रांमध्ये लेख, वाचकांचे पत्रव्यवहार इत्यादी माध्यमाद्वारे व्यक्त करतात. कधीकधी संघटनांचे संप, मोर्चे, उपोषणे, निदर्शने याचा शोध घेतात. परंतु या सर्वांच काही अल्प कालावधीत बर्फासारख वितळून पाणी होत. पुन्हा ये रे माझ्या मागल्या. ३४ वर्षे एकाच पदावर कारकून (कनिष्ठ, वरिष्ठ, अव्वल) म्हणून काम करणाऱ्या आणि त्याच पदावर सेवानिवृत्त झालेल्या व्यक्तीच्या मनाचा शोध घेतल्यास याच उत्तर मिळू शकेन.

**कर्मचाऱ्यांचे आयुष्य ए–फोर साईज.**

कर्मचाऱ्यांचे आयुष्य तसं ए–फोर साईजच असतं. सकाळी उठल्यानंतर मुलांच्या शाळांसाठीची आवरा आवर, स्वतःच्या ऑफीससाठीची आवराअवर, नंतर ऑफीसला जाणे, ऑफीसवरून घरी आल्यानंतर मुलांना क्लास (ट्युशन) मधून घरी आणणे. शक्य झाल्यास त्यांचा अभ्यास घेणे, नंतर जेवणे आणि झोपणे. महिन्यातून किंवा दोन महिन्यातून परिवारासहीत एखादा चित्रपट पाहणे. दिवाळी, उन्हाळा या सुट्यांमध्ये छोट्या सहलींचा स्वाद घेणे. दोघे नवरा–बायको, नोकरीस असल्यास काय अवस्था असेल? याची कल्पना देखील करवत नाही आणि त्यातच पीएच.डी. सारखे संशोधन करणे म्हणजे किती कष्टप्राय बाब असेल. हे ज्याचे तोच जाणे.

**कर्मचाऱ्यांच्या कष्टप्राय संशोधनाची कहाणी फारच वेगळी –** नियुक्ती अधिकाऱ्यांकडे प्रथम परवानगी मागावी लागते. परवानगीच्या पत्रामध्ये नियुक्ती अधिकारी अट लिहितात, कार्यालयीन कामकाजावर परिणाम होणार नाही, कोणतीही विशेष रजा, सवलत मिळणार नाही. मग कर्मचारी तारेवरच्या कसरतीप्रमाणे संशोधन पूर्ण करतो. सेवा खात्यातील अर्जित रजा, परिवर्तीत रजा, काहीवेळा विनावेतनी रजा घेवून संशोधन पूर्ण करतात. हे संशोधन करताना नागरी सेवा नियमातील अध्ययन रजा नियम अथवा आर्थिक मदत देण्याची कृपावृष्टी झाल्याची उदाहरणे ऐकीवात नाहीत. स्वतःच्या खर्चाने पीएच.डी. सारखे संशोधन पूर्ण करावे लागते. परंतु पुढील भविष्य अंधारात प्रकाश शोधण्यासारखे असते. अशा रूपये ३०,०००/– एकरकमी भत्ता म्हणजे कुचेष्टा म्हणावी. प्रबंधांच्या ०८ प्रती तयार कराव्या लागतात. त्याचा छपाई, बाईंडिंग खर्च रू.१४,५००/– + मौखिक परिक्षेचा प्रशासकिय खर्च रू.५,०००/– + प्रवेश शुल्क, पाच वर्षांचे शैक्षणिक शुल्क किमान ४०,०००/– रूपये + ग्रंथालये, कार्यालये, झेरॉक्स, पुस्तक खरेदी, तज्ञ व्यक्तींना भेटण्याचा पेट्रोल, बसभाडे रू.३० हजार + इतर खर्च रू.२ लाख ४० हजार. कर्मचारी पीएच.डी. झाल्यास भविष्यात इतर ठिकाणी किंमत नाही. फक्त अधिकारी (वर्ग२) व पीएच.डी. उत्तीर्ण असल्यास प्राध्यापक, संचालक, उपप्राचार्य पदांवर नियुक्ती घेवू शकते. कर्मचाऱ्यांना वर्तमान, भविष्यकाळात पीएच.डी. म्हणजे

## नोकरशाहीचं महत्त्व

नुकताच एक मोठा व भव्यदिव्य पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. त्यामध्ये वेगवेगळ्या खाजगी, सामाजिक, चित्रपट, नाटक, खेळ, व्यवसाय, संरक्षण इत्यादी क्षेत्रांमधील व्यक्तींचा पारितोषिक, पुरस्कार, प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला. प्रत्येकाने आपआपली मनोगते थोडक्यात मांडली. परंतु त्यातील एका बलाढ्य, नामांकित व्यावसायिकाने नोकरशाहीबद्दल थोडी नाराजी व्यक्त केली. ही बाब थोडी खटकली. कारण हा व्यावसायिक धनाढ्य किंवा नावारूपाला आला तो त्याच्या नोकरांनी काम केले म्हणूनच. परंतु याचा कदाचित त्यांना पारितोषिक घेताना तात्पुरता विसर पडला असावा. कोणतेही काम नोकरवर्गाविना होत नसते. हे आपणांस माहित आहेच. काहीजण कितीही मोठे अधिकारी झाले तरी ते स्वतःला व्यवस्थेतील नोकर समजतात. खाजगी, सरकारी नोकर असे दोन वर्ग आहेत. तसेच या भव्यदिव्य पारितोषिक वितरण समारंभामध्ये एखाद्या कारकून किंवा एखाद्या सफाई कामगारास एखादा पुष्पगुच्छदेखील दिला गेला नाही.

## कर्मचाऱ्यांचे बायोपीक

सध्या मोठमोठ्या लेखकांच्या, नाटकांमध्ये चित्रपटांमध्ये काम करणाऱ्या नटनट्यांच, खेळाडूंच, खेळांच बायोपिक. दर महिन्याला चित्रपट, नाटक, सिरीयल स्वरूपात प्रसारीत होत आहे. यापूर्वी बऱ्याचशा राजा–राणी, योध्दे, इतिहासातील घटनांचा बायोपिकदेखील आले होते. त्याचबरोबर काही पुरातन धार्मिक कथा, दे यांच्यावर आधारित बायोपिक तयार करण्यात आली होती. बऱ्याच युगपुरूषांच, सामाजिक कार्यकर्त्यांच बायोपिक अधूनमधून दाखविले जाते. चित्रपट, सिरीयल्स, नाटके हा समाजातील घडामोडींचा आरसा आहे. अस म्हटले जाते. समाजात घडणाऱ्या दैनंदिन घटनांच दर्शन यामध्ये होत असते. बायोपिक म्हणजे चरित्रातून चित्रपट. एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यात घडलेल्या त्यांच्या लहानपणापासूच्या घटनांच्या, अडीअडचणींचा, जडणघडणीचा आलेख या बायोपीकमध्ये दाखविला जातो. काही शासकिय (सार्वजनिक) धोरणांवर आधारित सुविधांचे चित्रपट आजही पहावयास मिळतात. कदाचित सत्ताधाऱ्यांच्या प्रचाराच एक साधन म्हणून.

आजपर्यंत बऱ्याच क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्तींचे बायोपिक झाले व होत आहेत. उदा. नट, नट्या, सामाजिक कार्यकर्ते, हवाईदल, वायुदल, नौदल, पोलीस, गुंड, अतिरेकी, मंत्री, राजकारणी, इत्यादी. परंतु एखाद्या कारकुनाच्या आयुष्याचा बायोपिक गेल्या तीस वर्षांत पहावयास मिळाला नाही. याची कारणे काय असतील? ती शोधण्यास ज्यादा वेळ जाईल. पण एक कारण असू शकतं. व्यवस्थेतील सर्वांत कमी कवडीमोल असलेला हा घटक, वर्ष १९८९ मध्ये मनोजकुमार या हिरोने क्लर्क हा हिंदी सिनेमा प्रदर्शित केला होता. त्यामध्ये एका प्रामाणिक कारकुनाच आयुष्य दाखविले होते. त्याच्या वयोवृध्द वडिलांच, अपंग भावाच, त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबाच त्याला भक्कम रकमेची लॉटरी लागल्यानंतर त्याच्या कौटुंबिक आयुष्यात झालेल्या बदलाच चित्रीकरण दाखविले होते. त्यावेळी ८३ टक्के जनतेला हा सिनेमा आवडला होता. याच दरम्यान (१९८९–९०) 'वागळे की दुनिया' व 'मुंगेरीलाल के हसिन सपने' या दूरदर्शन वरील मालिका प्रसिध्द झाल्या. ९० टक्के जनतेस या मालिका आवडल्या. या मालिकांमध्ये त्या कारकुनाची त्रेधातिरपट, धांदल, कार्यालयातील, घरातील व्यक्तींचे टोमणे–तिटकारा, त्याची आर्थिक परवड, त्याची स्वप्ने यांचे दर्शन घडले. वरील परिस्थिती साधारणतः १९८० ते १९९५ च्या दशकांतील होती. आज परिस्थितीस २५ वर्षे उलटली आहेत.

काळानुरूप सर्वच बदलते हे आपणांस माहित आहेच. सामाजिक रचना, विचार, राहणीमान, खाण्यापिण्याच्या सवयी, राजकिय धोरणे इत्यादी बरेच. आता तर यंत्र युग सुरू झाले आहे. त्यामुळे सगळंच कस तांत्रिक झाल आहे. गेल्या पंचवीस वर्षात 'कारकून' या घटकाच्या बदलाकडे मात्र 'कवडीमोल' नजरेने पाहिजे जात आहे. प्रशासकिय व्यवस्थेतील हा महत्त्वाचा घटक दुर्लक्षिला गेला आहे. या 'कारकूना' च्या प्रशासकिय / कार्यालयीन आयुष्याचा वेध घेणारा एखादा बायोपीक/चरित्रात्मक चित्रपट प्रदर्शित झाल्यास हे आपणांस लक्षात येईल. सार्वजनिक ध्येयधोरणे, शासन निर्णय, नागरी सेवा नियम, अधिकारी, बदल्यांच राजकारण, पदोन्नती, समाजाचा काम पूर्ण होण्याचा दबाव, शारिरीक, मानसिक कामांचे दडपण, राजकारण इत्यादींचे बारकाईने चित्रण झाल्यास त्या 'कारकूना'च्या व्यथा प्रश्नांवर किमान दृष्टीक्षेप पडेल.

या लेखातील वरील व्यथांची चर्चा व त्या प्रकरणाची तपासणी राज्यपालांसारख्या उच्चपदस्त व राज्याच्या कर्त्या व्यक्तीने केल्यास व त्यांनी "कर्मचाऱ्याने पीएच.डी. सारखे उच्च शिक्षण घेवू नये म्हणून कार्यालयातील अधिकाऱ्यांनी त्यास क्लेशदायक वागणूक दिली व पीएच.डी. सारख्या शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न केला" असा शेरा नियुक्ती अधिकाऱ्यास कळविल्यास त्याचे गांभीर्य किती असेल? अशी प्रकरणे धोरणात्मक निर्णयापर्यंत पोहोचतच नाहीत किंवा त्यावर धोरणात्मक निर्णय घेणे हेतूपुरस्पर टाळले जाते. अशी प्रकरणे पोलीस प्रशासनाकडे दाखल झाल्यास पोलीस प्रशासन त्यावर फक्त चार शब्दांचे उत्तरे देते (सदर बाब प्रशासकीय स्वरूपाची/दिवाणी स्वरूपाची असल्याने तक्रारदाराने योग्य त्या मार्गाने न्याय मिळवावा). वास्तविक पोलीस प्रशासनास भारतीय दंड विधान प्रक्रियेतील नियम १६६, १६७, १७६, १७७, १८७, ३३६, ३७४ नुसार फौजदारी याचिका दाखल करणे आवश्यक आहे. परंतु तसे होत नाही. जर असे एखाद्या अनुसुचित जाती जमातीच्या कर्मचाऱ्याशी संबंधित घटना घडल्यास अनुसुचित जाती आयोग, सामाजिक न्याय विभाग यांचेकडे तक्रार अर्ज करूनही त्याबद्दल दखल घेतली जात नाही ही दुर्दैवाची बाब आहे.

अशा या कष्टप्राय संशोधनाच्या प्रवासातून पीएच.डी. सारखी पदवी प्राप्त केल्यास आणि फक्त त्याची किंमत (बाजारभाव/आर्थिक/भांडवली) रूपये ३०,०००/- असेल का? असा प्रश्न उपस्थित राहतो. कर्मचाऱ्यांची पीएच.डी. म्हणजे त्यांच्या दृष्टीने एक दिवा स्वप्नच असते. अशा या मनुष्यबळ विकासाच्या दुर्लक्षित घटकास रूपये ३०,०००/- एकरकमी भत्त्याऐवजी योग्य सन्मान झाल्यास त्याच्या आयुष्याचे खऱ्या अर्थाने सार्थक होईल असे वाटते.

## संदर्भ :-


१) केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या शिक्षण भत्यात वाढ :- महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, पृष्ठ क्र.१ दि. १९ मार्च, २०१९.
२) मा. राज्यपालांचे सचिव, महाराष्ट्र राज्य, राजभवन, मुंबई यांचे पत्र दि. १२ जानेवारी, २०१०, संदर्भ CS/pu/37/09/(6910)/107.
३) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाचे दि. २० ऑगस्ट २००९ संदर्भ CS/pu/37/09/(6910)/2774. चे पत्र.
४) मा. राष्ट्रपती कार्यालयाचे पत्र दि. १८ डिसेंबर, २००९ व दि. २४ मे, २०११.
५) मा. सचिव, न्याय व विधी विभाग, नवी दिल्ली यांचे पत्र, दि. १५ मार्च, २०१०.
६) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१, नियम ८० ते ९३ (अध्ययन रजा), प्रकरण क्र.७
७) विद्यापीठ प्रमाणसंहिता १९८४, नियम ४० जी.
८) समतोल विकासाचे आव्हान : उच्चशिक्षित कुशल मनुष्यबळ हे आपले वैशिष्ट्य :- दै. सकाळ दि. १ मे, २०१०, पृष्ठ १.
९) शिक्षणाच्या गुणवत्तेकडे दुर्लक्ष नको : राष्ट्रपती :- दै. सकाळ दि. २७ सप्टेंबर २००९, पृष्ठ १.
१०) प्रा. ए.जी. गोसावी समिती अहवाल, दि. ११/०८/२००९.
११) पुणे जिल्हा न्यायालय, पुणे येथील स्पे.मु.नं. ३५४/२०१२.
१२) मुंबई उच्च न्यायालय, मुंबई दिवाणी याचिका क्र.WP/7604/2016.
१३) विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे दि.२९ नोव्हेंबर, २०१०. संदर्भ क्र.F-37-6/2007(SU-II) चे पत्र.
१४) राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, निगडी, पुणे यांचे पत्र दि. १० जुलै २०१२ व दि. २८/०५/२०१४ संदर्भ NCSC/Pune/6/2014-SSWUIII/260.
१५) लाल फितीतले कागदी घोडे, अक्षर वाड्मय प्रकाशन, प्रथम आवृत्ती, डिसेंबर, २०१६, पृष्ठ क्र.८४.